REVIEW OF RESEARCH

VOLUME - 6 | ISSUE - 9 | JUNE - 2017

# नागरीकरण व झोपडपट्ट्यांची वाढ

प्रा. शिंदे शाम भागवत
राज्यशास्त्र विभाग,
महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर



**प्रस्तावना :-**

भारतात प्राचीन काळापासून शहरे होती, परंतु नागरीकरणाची प्रक्रिया प्रचलित नव्हती. नागरीकरणाची प्रक्रिया आधुनिक आहे. पाश्चिमात्य देशात औद्योगीक क्रांतीनंतर या प्रक्रियेची सुरूवात झाली. भारताच्या संदर्भात विचार करावयाचा झाल्यास शहरीकरणाचा प्रारंभ एकोणीसाव्या शतकापासून झाला असे निश्चितपणे म्हणता येईल. ब्रिटीश अमदानीत यांत्रिकीकरणाचा पाया घातला गेला. यापूर्वी कृषीक्षेत्र, गृहोदयोग व इतर क्षेत्रात पारंपारिक साधनांचा, प्राणिशक्ती-मनुष्यशक्तीचा वापर केला जात असे. परंतु यांत्रिकीकरणामुळे कारखाना पध्दती विकसीत झाली. स्वयंचलित यंत्रे वाफ, कोळसा, तेल, वीज, अणुशक्तीच्या साहाय्याने चालू लागली. उत्पादनाच्या साधनातील क्रांतीबरोबरच उत्पादनातही क्रांती झाली; उत्पादनाची क्षेत्रे वाढली. या उत्पादनांच्या साधनांचे केंद्रीकरण झाल्यामुळे शहरे वाढू लागली आणि नागरीकरणाची प्रक्रिया प्रत्ययास आली. डॉ. सी.ए. हॉक्सि आदीस या ग्रीक वास्तुशास्त्रज्ञानाच्या मताप्रमाणे, ‘‘माणूस वस्ती करून राहू लागल्यावर कित्येक शतके शहरीकरणाची समस्या नव्हती.’’[1] औद्योगिक क्रांती, दळणवळणाच्या साधनांच्या प्रचलनातून नागरीकरण सुरू झाले.

आजचे शहरीकरण हे औद्योगिकीकरणाचे अपत्य आहे. या शहराची संपन्नता ही एक बाजू आहे तर दैन्य (गरीबी) ही दुसरी बाजू आहे. कोणत्याही देशातील, राज्यातील अथवा जिल्ह्यातील नागरीकरणाचे काही दुष्परीणाम दिसून येत असले तरी शहरातील लोकांना ग्रामीण भागापेक्षा अधिक चांगले जीवन जगण्याची संधी प्राप्त होते. त्यामुळे जगातील प्रत्येक देशात, राज्यात अथवा जिल्ह्यात नागरीकरणाची पातळी सतत वाढत असल्याचे दिसून येते. कारण ग्रामीण भागापेक्षा नागरीभागात आर्थिक विकासाच्या अधिक सोयी-सुविधा उपलब्ध असतात किंवा नवनवीन तंत्रज्ञानाचा शोध घेऊन त्या निर्माण केल्या जातात. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासात ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरांचे महत्व अनन्यसाधारण असे वाढत जाते.

मुंबईत होणारे स्थलांतर वाढले यामुळे मुंबईच्या लोकसंख्येत पर्यायाने नागरीकरणात वाढ होत गेली. ‘‘महाराष्ट्रातील नागरी करणाच्या अनुकुल प्रभावाचा विनाश करणारा नागरीकरणाचा एक वास्तव दुर्दैवी परिणाम म्हणजे नागरी भागातील झोपडपट्टी हा होय. सन 2001 नुसार महाराष्ट्रातील 1.06 कोटी लोक झोपडपट्ट्यामध्ये राहत असून त्यापैकी सर्वात मोठी झोपडपट्टी धारावी आहे व त्यामुळे आशियातील सर्वात मोठ्या झोपडपट्टीचा मान मुंबईने पटकाविला आहे. बृहन्मुंबईतील 1.19 कोटी लोकसंख्येपैकी 49% लोकसंख्या झोपडपट्टीमध्ये राहते. कोलकत्ता, चेन्नई, दिल्ली व बंगलोरमध्ये हे प्रमाण अनुक्रमे 33%, 26%, 19% व 8% एवढे आहे.[2]

**नागरीकरण प्रक्रिया - अर्थ - स्वरुप :-**

झोपडपट्ट्या प्रत्यक्षात कशा अस्तीत्वात येतात याचा अभ्यास करताना प्रथमतः नागरीकरणाची प्रक्रिया समजून घेणे आवश्यक ठरते आणि या प्रक्रियेतून झोपडपट्टयांचा उदय कसा होतो त्याचे चित्र स्पष्ट होते.

देशातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात नगरातील लोकसंख्येत होणाऱ्या वाढीची प्रक्रिया म्हणजे नागरीकरण होय. सामान्य अर्थाने शहरीकरण म्हणजे लोकसंख्येच्या केंद्रीकरणाची प्रक्रिया होय. शहरीकरणाची प्रक्रिया स्थलांतरातून सुरु होते. ग्रामीण विभागातून शहरी विभागाकडे होणारे लोकांचे स्थलांतर हे शहरी लोकसंख्या वाढीचे मुख्य कारण आहे. शहरीकरणाची प्रवृत्ती प्राचीन असली तरी आधुनिक काळात ती प्रकर्षाने वाढलेली दिसते. तंत्रविज्ञानाच्या साहाय्याने माणसाने अनेक उद्योगधंदे निर्माण केले. त्यांचे केंद्रिकरण शहरात झाले. त्यामुळे तेथील लोकसंख्या प्रमाणाबाहेर वाढली. वाढत्या औद्योगीकरणामुळे शहरांची संख्या व विस्तार वाढत आहे. उद्योगधंदे, रोजगार यासाठी ग्रामीण भागातील लोंढे शहराकडे वाहत आहेत.

नागरीकरण या प्रक्रियेचा अर्थ समजण्यापूर्वी नगर वा शहर म्हणजे काय हे समजणे अधिक आवश्यक आहे. तसे म्हटले तर शहराची निश्चित अशी व्याख्या करणे सोपे काम नाही. परंतु आपल्या विवेचनासाठी नगराची व्याख्या आपण पुढील प्रमाणे करु शकतो, ‘‘नगर, सामाजिक विविधतेचा असा समुह किंवा गट असतो की ज्यात, दुय्यम संबंध व नियंत्रण, उद्योग व व्यापार, दाट लोकवस्ती व अवैयक्तिक संबंध, यांना प्राधान्य दिले जाते.’’[3]
बर्गेलच्या मताप्रमाणे, ‘‘नागरीकरण ही अशी प्रक्रिया आहे की ज्या प्रक्रियेत ग्रामीण समुदायाचे शहरी समुदायात रुपांतर होते.’’[4] ‘‘कृषी व्यवसायाशी संलग्न खेड्यातील लोकसंख्या जेंव्हा व्यापार, उद्योग, शासकीय व्यवहार चालत असलेल्या मोठ्या समुदायाकडे स्थलांतरीत होत असेल तर त्या प्रक्रियेला नागरीकरण म्हणतात.’’

नेल्स अंडरसनच्या मते ''ज्या ठिकाणी उद्योगशिलता अधिक प्रमाणात आढळते आणि संपूर्ण जीवनपध्दती नवीन तयार होते त्यास नागरीकरण असे म्हणतात.'' ''नागरीकरण म्हणजे नगरे आणि शहरामध्ये लोकसंख्येचे केंद्रीकरण घडून येणे होय.'' असे डॉ. माजिद हुसैन म्हणतात. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अनुसार ''नागरीकरण हे ग्रामीण वस्तीचे स्थलांतर आहे. व्यवसायाचे तसेच उत्पादनाचे स्थलांतरण आहे.''[5]

नागरीकरण आणि औद्योगिकरण या दोहोंचा अति निकटचा संबंध आहे. या दोन्ही प्रक्रिया हातात हात घालून वाटचाल करीत असतात. आर्थिक विकासाकडे वाटचाल करणाऱ्या राष्ट्रात औद्योगिकरणावर भर दिला जातो. समतोल आर्थिक विकासासाठी हे आवश्यक असते. नागरी सुविधांनी युक्त असलेल्या अशा औद्योगिक शहराकडे लोक खेचले जातात. त्यातुनच नागरीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात होते. नागरीकरणाच्या प्रक्रियेची गती औद्योगिकरणाच्या प्रक्रियेच्या गतीवर अवलंबून असल्यामुळे औद्योगिकरणाच्या विकासाच्या अवस्थानुसार नागरीकरणाचाही विविध अवस्थामधून विकास होत जातो. त्यासच नागरीकरणाच्या अवस्था असे म्हणतात.

**नागरीकरणाच्या अवस्था :-**

1) नागरीकरणाची सुरुवात प्रथमतः मंद असते कारण औद्योगिकरणाला नुकतीच सुरुवात झालेली असते.
2) औद्योगिकरणाचा वेग जाणवण्या इतपत वाढलेला असतो. परिणामी जुन्या औद्योगिक शहरातील लोक या नवीन औद्योगिक शहरात स्थलांतरीत होतात आणि नागरीकरणाच्या प्रक्रियेची गती वाढते.
3) तिसऱ्या अवस्थेत नागरीकरणाची कमाल अवस्था गाठली जाते. कारण औद्यागीक विकास पूर्ण गाठला जातो.
4) कालांतराने नागरीकरणाची गती कमी होते. नागरीकरणाची प्रक्रिया पूर्ण झालेली असते.

नागरीकरणाची प्रक्रिया भारतात मागील दिडशे वर्षापासून चालू झालेली आहे, या नागरीकरणास उत्तरदायी घटक कोणते, याचा परामर्श घेणे आवश्यक ठरते. ''1951 नंतर नागरीकरणाला पोषक वातावरण आपल्या देशात निर्माण झाले. त्या वातावरणाशी संबंधीत घटकांनाच नागरीकरणास उत्तरदायी घटक असे म्हणता येईल. हे घटक पुढील प्रमाणे सांगता येतील.''

**1) नैसर्गीक वाढ :-**

लोकसंख्येतील नैसर्गीक वाढ हे नागरीकरणाचे महत्वाचे कारण आहे. अर्थात या कारणास एकमात्र कारण मानता येणार नाही. मृत्यूदरापेक्षा जन्मदराचे प्रमाण महत्तम असले म्हणजे नैसर्गिक वाढ होते. ''उदा. 1921 मध्ये जन्मदर 49.2 तर मृत्युदर 48.6 होता. परंतु 1921 नंतर ही परिस्थिती बदलली. जन्मदराचे प्रमाण कायम राहिले आणि मृत्यूदर झपाट्याने कमी होऊ लागला. 1971 मध्ये जन्मदर 39.9 व मृत्यूदर 21 झालेला दिसतो.''[6] म्हणजेच लोकसंख्येत नैसर्गीक वाढ जलद गतीने झालेली आढळते. त्यातूनच भारतातील नगरातील लोकसंख्या वाढू लागली व नागरीकरणाची प्रक्रिया प्रत्ययास आली.

**2) दळवळणाच्या साधनात वाढ :-**

दळणवळणाच्या साधनामुळे भारतीय समाजात लोकसंख्येचे स्थलांतरण होऊ लागले हे स्थलांतरण 1947 नंतर विशेषत्वाने झालेले दिसते. पोस्ट, टेलिग्राफ, टेलीफोन, रेडिओ, टेलिव्हिजन ह्या संदेशवहनाच्या साधनासमवेतच देशात पक्क्या व कच्च्या रस्त्याचे जाळे विणल्या गेले. आगगाडी, विमाने, मोटार व जहाजांची संख्या वाढली त्यामुळे प्रवास (आवागमन) अतिशय जलद व सुलभ होऊ लागला. त्यायोगे अर्थातच औद्योगिकरणास साहाय्य मिळाले. हजारो कारखाने उघडण्यात आल्यामुळे शहरी समुदायातील लोकसंख्या वाढू लागली आणि नागरिकरणाची प्रक्रिया सुलभ झाली. दळणवळणाची साधने व त्यांचा वेग जितका जास्त, तितकी शहरीकरणाची प्रक्रियाही जलद असते.

**3)औद्योगिकरण :-**

आधुनिक काळात नागरिकरणास उत्तरदायी असलेल्या घटकामध्ये औद्योगिकरण हा मुलभूत घटक आहे. ज्या प्रदेशात औद्योगिकरण जास्त झालेले असते, त्या भागात नागरीकरणाची प्रक्रिया विशेषाने कार्यान्वित झालेली दिसते.

**4)व्यापार, शिक्षण, मनोरंजन व इतर :-**

भारतातील नागरीकरणासाठी व्यापारातील वृध्दी, शिक्षणाचा प्रसार आणि मनोरंजनाचे व्यापारीकरण प्रामुख्याने कारणीभूत असलेले दिसते. विसाव्या शतकापासून व्यापाराचा वेग वाढला, व्यापारामुळे नागरीकरणास प्रोत्साहन मिळाले. शिक्षण समाजजीवनाचे आवश्यक अंग झाले आहे. शिक्षणाचा प्रसार विसाव्या शतकातच आणि त्यातल्यात्यात 1947 नुसार झालेला आढळतो. अनेक प्राथमिक, माध्यमिक, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ उघडली गेल्यामुळे व खालच्या स्तरातील शिक्षणाच्या प्रसारामुळे हजारो लोक शहराकडे स्थलांतरीत झाले आणि त्यातूनच शहरीकरणास गती मिळाली. तसेच मनोरंजनाच्या सुविधेमुळेही शहरीकरणात वाढ झाली.

कोणत्याही नगरात थोडा वेळ फेरफटका मारला तर अनेक मजली सुंदर इमारती औद्योगिक प्रतिष्ठाने, प्रार्थना मंदिरे, बँका, शैक्षणिक संस्थाच्या इमारती आपले लक्ष आकर्षित करतात. परंतु त्याच वेळी त्यांच्या लगतच असलेल्या अनेक कच्चा झोपड्यांचा समुह आपले लक्ष वेधून घेतो. रेल्वे स्टेशनला लागून, रेल्वेच्या पुलाच्या आश्रयाने, एखाद्या कारखान्याच्या कंपाऊंडला लागून, शहराच्या मध्यवर्ती भागात वा शहरापासून दुर अवैधरीत्या उभारलेल्या झोपड्यांच्या समुहाला गलिच्छ वस्ती असे म्हणतात. नगर आणि गलिच्छ वस्ती यांच्यातील संबंध लक्षात घेता, 'शहर तेथे गलिच्छ वस्ती' अशी नवीन म्हण आता प्रचलित झाली आहे.

**ई.ई. बर्गेलच्या मते -** ''गलिच्छ वस्त्या म्हणजे शहरातील निम्न दर्जाची निवासस्थानाची स्थिती असलेले भाग होय.''[7]

बर्गेल ई.ई. यांनी स्थलांतरीतांची तीन प्रमुख कारणे सांगितली आहेत. (1) प्राथमिक उद्देश पैसा मिळवणे. (2) ग्रामीण उत्पादनापेक्षा जास्त उत्पादन करणे. (3) गावाबाहेर येवून जास्त पैसा मिळेल असा रोजगार मिळवण्याचा प्रयत्न करणे.[8] झोपडपट्टीचा उदय होण्याकरीता अनेक कारणे कारणीभूत ठरतात. त्यातील पहिले कारण म्हणजे जे लोक समाजाने बहिष्कृत केलेले असतात अशा लोकांना राहण्याची सोय नसल्यामुळे झोपडपट्टीत राहतात. त्यात भिकारी, रोगी,

भुरटे चोर, इत्यादींचा समावेश होतो. तसेच दुसरे म्हणजे खेड्यातील लोक जेंव्हा शहराकडे रोजगार मिळवण्याकरिता धाव घेतात तेंव्हा त्यांना राहण्याकरीता जागा नसते. त्याकरीता त्यांना झोपडपट्टीत राहावे लागते. आणि शेवटचे कारण म्हणजे नागरी वस्तीच्या मानाने जेंव्हा घरभाडे देणे परवडत नाही तेंव्हा बऱ्याच लोकांना झोपडपट्टीत येवून राहवे लागते. तसेच या झोपडपट्टीत अनेक प्रकारचे लोक वास्तव्य करतात. त्यात काही कायमचे रहिवाशी असतात की, ज्यांना जन्मभर या वस्तीत राहवे लागते. तर त्यातील काही लोक संधीसाधू किंवा गरजू असतात. संधीसाधेपर्यंतच त्या ठिकाणी राहतात नंतर दुसरीकडे राहावयास जातात. त्याशिवाय त्यात काही वाममार्गी लोक वास्तव्य करतात जसे की, वेश्या, जुगारी, गुन्हेगारी, भटके इत्यादी.

झोपडपट्टी किंवा गलिच्छ वस्ती ही सध्याच्या नागरी व्यवस्थेची अविभाज्य अंग झाली आहे. विकसीत देशात गेल्या शतकापासून आणि विकसनशील देशात गेल्या 40-45 वर्षापासून झोपडपट्टीच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. जगातील बहुतेक सर्व विकसनशील देशामधील महानगरामध्ये झोपडपट्टीच्या समस्या भेडसावत आहेत. भारतातही दुसऱ्या महायुध्दानंतर या समस्याकडे गंभीरपणे बघितले गेले. भारतातील विविध भागात झोपडपट्टीस वेगवेगळ्या शब्दांनी संबोधिले जाते. "दिल्लीकडील भागात त्याला 'झुग्गी' म्हणतात तर कलकत्यास त्यास 'बस्ती' म्हणतात. तसेच चेन्नईमध्ये गलिच्छ वस्त्यांना 'चेरी' या नावाने ओळखतात तर कानपुर मध्ये गलिच्छ वस्त्यांना कटरा/अहाता या नावाने ओळखतात. तर मुंबईमध्ये 'झोपडपट्टी/चाक' म्हणतात."[9] विविध अभ्यासक अशा वस्तींचा उल्लेख खालावलेली वस्ती, गरिबांची वस्ती, उस्फुर्तपणे अस्तित्वात आलेली वस्ती अशा शेलक्या शब्दांनी करतात. अभ्यासकांनी आणि विशेषतः संयुक्त राष्ट्रसंघ शैक्षणिक, वैज्ञानिक, सांस्कृतिक संघटनेने (UNESCO) झोपडपट्ट्यांची जी परिभाषा केली आहे त्याद्वारे झोपडपट्ट्यांची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतील.

1) झोपडपट्ट्यामधील घरांची स्थिती अत्यंत दयनिय असते.
2) झोपडपट्ट्यामध्ये घरांची आणि घरामध्ये स्त्री-पुरुषांची फार गर्दी असते.
3) सभोवतालचा परिसर अत्यंत अस्वच्छ असतो. आरोग्याच्या दृष्टीने घातक वातावरण असते.
4) रस्ते, मुताऱ्या आणि संडासांची दुरावस्था असते किंवा या बाबी अस्तित्वातच नसतात.
5) मोठ्या प्रमाणावर गरिबी, अज्ञान आणि बेकारी दिसून येते.

नागरीकरणाचा सामाजिक दृष्टीने अभ्यास करणारे नागरीकरणाला 'सामाजिक कल्याण' या दृष्टीने महत्व देतात आणि निवास व झोपडपट्टी यांचा नागरीकरणाशी फार जवळचा संबंध जोडून नागरीकरणाचे धोरण म्हणजे निवासाचे धोरण आणि झोपडपट्ट्यांचे प्रश्न सोडविण्याचे धोरण समजतात. वास्तविक पाहता नागरीकरणाच्या प्रश्नांचा संबंध आर्थिक अभिवृध्दीशी आहे असे नागरीकरणाचे नवीन अभ्यासक मानतात. आर्थिक अभिवृध्दी/विकास धोरणाच्या संदर्भात नागरीकरणाच्या प्रश्नांचा अभ्यास केला पाहिजे. बऱ्याच वेळा निवास समस्या, झोपडपट्टी समस्या इत्यादीवर लक्ष केंद्रित केले आणि आर्थिक विकासाचा संदर्भ सुटला तर स्थलांतरावर प्रतिबंध घालणे किंवा त्यास निरुत्साहीत करणे असे उपाय सुचविले जातात. नागरीकरण मग अनिष्ठ वाटू लागते. खरे पाहता नागरीकरणाची प्रवृत्ती ही अतिशय वांछनिय मानली पाहिजे. देशात आर्थिक विकास आणि सामाजिक स्थित्यंतरे घडवून आणण्यासाठी ती आवश्यक देखील आहे. मात्र, महानगरातील झोपडपट्ट्यांची समस्या कशी दूर करता येईल याही प्रश्नाकडे तेवढेच लक्ष दिले पाहिजे. स्थूल मानाने विचार करता झोपडपट्टीच्या समस्या सोडविताना पुढील प्रमुख उपायांचा विचार करता येईल.

1) झोपडीवासीयांना नवीन गाळे बांधून देणे वा सध्याच्या घरामध्ये सुधारणा करणे. यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आवश्यक आहे. झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण करुन त्यातील एखाद्या पट्ट्यात मुताऱ्या व संडासची सोय करावी आणि तेथील झोपड्या दूर सारुन त्या झोपडीवासीयांना इतरत्र निवास व्यवस्था उपलब्ध करुन द्यावी. तसेच अस्तित्वात असणाऱ्या झोपडपट्ट्यामध्ये वीज व पाणी पुरवठा, शाळा आदी सोई उपलब्ध करुन द्याव्यात.
2) झोपडपट्ट्यामध्ये कल्याण केंद्रे सुरु करावीत. बालकांची आणि स्त्रियांची काळजी या कल्याण केंद्रांनी घ्यावी.
3) झोपडीवासीयांना विविध संधी प्राप्त होऊ शकतील या दृष्टीने मदत केली जावी.
4) अनधिकृत झोपडपट्ट्या वाढणार नाहीत याकडे लक्ष पुरविले पाहिजे.

झोपड्यांचे उग्र स्वरुप लक्षात घेता, या समस्येची उकल करण्याकरिता त्यातील रहिवाशी व बाकीच्या समाजातील लोक यांच्यात सामाजिक संवाद व्हायला हवा. या दोन गटांचे मानसिक व सामाजिक व्यवहार होण्याकरिता झोपडपट्टी व इतर समाजांचे संबंध प्रस्थापित होणे आवश्यक आहे. या कार्यासाठी सामाजिक देवघेव करण्यास उपयुक्त ठरतील अशा संस्थांचे कार्य महत्वाचे आहे. अर्थात झोपडपट्ट्यांचा प्रश्न आर्थिक व सामाजिक आहे, तसाच तो माणुसकीचाही आहे ही भावाना समाजात मुळ धरणे हे ही तेवढेच आजच्या काळात गरजेचे बनले आहे.

**संदर्भ सूची :-**


1) प्रा. खडसे भा.कि. - भारतीय सामाजीक समस्या, मंगेश प्रकाशन – नागपूर, प्रथमावृत्ती – 1978, पृ. 138.
2) उपरोक्त - सोळुंके रा.सु. व गावंडे ग.भा., पृ. 66.
3) डॉ. लवानिया एम.एम. - भारत मे सामाजिक परिवर्तन एवं समस्यांए, प्रकरण 9, पृ. 291.
4) उपरोक्त - प्रा. खडसे भा.कि., पृ. 140.
5) उपरोक्त - सोळुंके रा.सु. व गावंडे ग.भा., पृ. 48.
6) उपरोक्त - प्रा. खडसे भा.कि., पृ. 143.
7) Bergel E.C. - The nature of slum "Quoted from A.R. Desai and Pillai" Slums and urbanization", page 39.
8) उपरोक्त – Mathew T.V. (Preface).
9) अर्थसंवाद – खंड 16, अंक 3, ऑक्टो.-डिसें. 1992, कोल्हापूर, पृ. 256.